**<u>ठळक बातम्या</u>**

- चालू आर्थिक वर्षात राज्याचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहण्याची शक्यता आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त

- वीज ग्राहकांच्या फायद्यासाठी राज्य सरकार प्रधानमंत्री मोफत सूर्यघर योजनेसारखी योजना राबवणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

- जनतेच्या कामांमध्ये राजकारण न आणता विकासयात्रेत सहभागी होण्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं विरोधकांना आवाहन

- राज्यात गेल्या दहा वर्षांतली सर्वाधिक परकीय गुंतवणूक झाल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**आणि**

- येत्या दोन दिवसात मुंबई, ठाणे तसंच रायगडमध्ये उष्णतेच्या लाटेचा हवामान विभागाचा इशारा

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षात राज्याचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. कृषी आणि निगडीत क्षेत्र ८ पूर्णांक ७ दशांश, सेवा क्षेत्र ७ पूर्णांक ८ दशांश आणि उद्योग क्षेत्र ४ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांनी वाढण्याची शक्यता राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात वर्तवली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत आज हा अहवाल मांडला. या

आर्थिक वर्षात राज्याचे स्थूल उत्पन्न ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी रुपये राहण्याची शक्यता आहे. तर दरडोई उत्पन्न २ लाख ७८ हजार ६८१ रुपयांवरून ११ टक्क्यांनी वाढून ३ लाख ९ हजार ३४० रुपये होण्याचा अंदाज आहे. स्थूल उत्पन्नाचा विचार करता महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असेल. मात्र दरडोई उत्पन्नामध्ये तेलंगणा, कर्नाटक, तमिळनाडू यांच्यानंतर राज्याचा क्रमांक लागतो.

गेल्या आर्थिक वर्षात राज्याचे महसुली उत्पन्न ४ कोटी ८६ लाख ११६ कोटी रुपये होते. यंदा ते केवळ १३ हजार कोटींनी वाढून सुमारे ५ लाख कोटी रुपये होईल, असा अंदाज या अहवालात वर्तवला आहे. गेल्यावर्षी ५ लाख ५ हजार ६४७ कोटी रुपये असलेला महसूली खर्च यंदा ५ लाख १९ हजार ५१४ कोटी होण्याची शक्यता आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्याची राजकोषीय तूट २ पूर्णांक ४ दशांश टक्के आणि महसुली तूट ४ दशांश टक्के असेल, असा राज्य सरकारचा अंदाज आहे.

<><><><>

प्रधानमंत्री मोफत सूर्यघर योजनेच्या धर्तीवर राज्य सरकार नवी योजना आणणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला उत्तर देताना ते विधानसभेत बोलत होते. या  योजनेच्या अंतर्गत शंभर युनिट पर्यंत वीज वापरणाऱ्या दीड कोटी ग्राहकांना घराच्या छतावर सौर पॅनल बसवता येतील आणि त्यातून त्यांना मोफत वीज मिळेल. स्मार्ट मीटर लावणाऱ्या घरगुती ग्राहकांनी दिवसा वापरलेल्या वीजेवर सवलत देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केली.

***होल्ड मुख्यमंत्री बाइट***

राज्यात १५ लाख ७० हजार कोटींचे गुंतवणूक करार करण्यात आले. यात उद्योग विभागानं ११ लाख ७१ हजार कोटी, MMRDA ने ३ लाख ४४ कोटी, सिडकोने ५५ हजार दोनशे कोटी रुपयांचे करार केल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ही गुंतवणूक गुजरातपेक्षा तीनपट जास्त असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. शक्तीपीठ महामार्गासाठी लवकरच जमीन अधिग्रहण सुरू होईल. यामुळं मराठवाड्याचा वेगाने विकास होईल. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र मध्य भारताशी जोडला जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातील सर्वसामान्य माणसाचे आयुष्य सुकर करण्याचं राज्य सरकारचं उद्दिष्ट आहे. त्यामुळं विरोधकांनी जनतेच्या कामांमध्ये राजकारण न आणता विकासयात्रेत सहभागी व्हावं, असं आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधान परिषदेत केलं. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. जनतेच्या कल्याणासाठी दुप्पट वेगाने आणि चौपट क्षमतेने राज्याचा विकास करायचा आहे. सगळ्या विभागांचा शंभर दिवसांचा आढावा घेऊन त्यांना पुढच्या पाच वर्षाची दिशा दिली असल्याचे त्यांनी सांगितलं. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे कुठलेही निकष बदलण्यात आलेले नाहीत. ज्या बहिणी पात्र आहेत त्यांना कधीही अपात्र ठरवलं जाणार नाही. ही योजना बंद होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी यावेळी पुन्हा दिली.

शिवरायांचा, शंभूराजांचा अवमान कधीही सहन केला जाणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. यावेळी त्यांनी शक्तीपीठ महामार्ग, सोयाबीन खरेदी, औद्योगिक क्षेत्रातली गुंतवणूक यासह विविध मुद्द्यांचा आढावा घेतला.

**<><><><>**

धनंजय मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी माध्यमांसमोर दिली, मात्र सभागृहाला हे अजूनही कळवलेलं नाही, हा सभागृहाचा अवमान आहे असा आरोप विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आज विधानसभेत केला. कुठल्याही मंत्र्याने राजीनामा दिल्यावर ते सर्वात आधी सभागृहाला कळवलं जातं, नंतर ते माध्यमांना सांगितलं जातं, त्यामुळे असा चुकीचा पायंडा पाडू नये, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी सभागृहात सांगितलं. मात्र असं कळवण्याची पद्धत नाही, मात्र यासाठी स्वतंत्र नोटिफिकेशन काढली जाईल, असं तालिका अध्यक्ष संजय केळकर यांनी सांगितलं. यावर विरोधी पक्षाच्या सदस्यांचं समाधान न झाल्यामुळे त्यांनी घोषणाबाजी सुरू केली आणि सभात्याग केला.

**<><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल परब यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान स्वतःची तुलना छत्रपती संभाजी महाराजांशी केल्याचा आणि राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप करत विधान परिषदेत आज सत्ताधारी आक्रमक झाले. दोन्ही बाजूंनी झालेल्या शाब्दिक खडाजंगीमुळे कामकाज तीनदा तहकूब करावं लागलं.

आज नियमित कामकाज सुरू होताच भाजपा गटनेते प्रवीण दरेकर यांनी या मुद्दा उपस्थित करत अनिल परब यांनी माफी मागावी अशी मागणी केली. अनिल परब यांच्या म्हणण्याच्या अर्थाचा अनर्थ करण्यात आला मात्र काही अवमानकारक असल्यास विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिलगिरी व्यक्त करत असल्याचं सांगितलं. विरोधी पक्षनेत्यांनी दिलगिरी व्यक्त केल्यामुळे या वादावर पडदा पडावा, अशी अपेक्षा संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केल्यानंतर सुरळीत कामकाज सुरू झालं.

विधान परिषदेत आज २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या ६ हजार ४८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या चर्चेनंतर मंजूर करण्यात आल्या. मात्र, खर्च आणि उत्पन्नाचा योग्य ताळमेळ नसल्यानं राज्य सरकारच्या तिजोरीत खडखडाट असल्याची टीका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज विधानपरिषदेत पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेत केली.

**<><><><><>**

गेल्या दहा वर्षांतली विक्रमी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात केवळ नऊ महिन्यात आली असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. केंद्र सरकारच्या उद्योग संवर्धन आणि देशांतर्गत व्यापार विभागानं डिसेंबर २०२४ पर्यंतचा परकीय गुंतवणुकीसंदर्भातल्या अहवालात ही माहिती दिली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षातल्या पहिल्या ९ महिन्यात आतापर्यंत एकूण १ लाख ३९ हजार ४३४ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक आली आहे. ही गेल्या १० वर्षात महाराष्ट्रात एका वर्षात आलेली सर्वाधिक परकीय गुंतवणूक आहे. या गुंतवणुकीसह महायुती सरकारनं आपलाच २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा विक्रम मोडला आहे, संपूर्ण महाराष्ट्राचं पुन्हा एकदा

मनःपूर्वक अभिनंदन, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात आनंद व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

जागतिक महिला दिनानिमित्त राज्यातल्या प्रत्येक ग्रामपंचायतीत विशेष ग्राम सभा आयोजित करण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला आणि  बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. महिलांच्या हक्कांसाठी व्यापक लोकचळवळ उभी रहावी, महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रभावी धोरणं गावपातळीवर अंमलात यावीत आणि महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना राबविल्या जाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

**<><><><><>**

मुंबई जवळच्या समुद्रातल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे सध्या हवेची चक्राकार स्थिती निर्माण झाली असून त्यामुळे पूर्वेकडून जोरदार वारे येण्याची शक्यता आहे. या वाऱ्यांमुळे मुंबईतलं तापमान सरासरीपेक्षा ४ ते ५ अंश सेल्सिअस पेक्षा अधिक वाढणार असल्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. त्यामुळे मुंबईत उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. येत्या दोन दिवसात मुंबई, ठाणे आणि रायगड च्या परिसरातलं तापमान ३८ अंश सेल्सिअस पर्यंत वाढण्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**